**हे असे वागणे...**

हे असे वागणे तुझे मला पण कधीच पटले नाही
वरुनी बहाणे, केविलवाणे, आत धुमसते काही.
रोज जरी तू रंग कोवळे, घेऊनि फिरतो दारी
तुला माहिती रात्रही काळी, तुझी पोतडी भारी.
भले भले ते तुटले, फसले, नको उद्याची आशा
पुन्हा पुन्हा त्या चक्री फिरवीशी, तीच गुलाबी भाषा.
उन्हे काटेरी टोचत बसतो म्हणे, शोध विसावा
जाळीत फिरतो ढग चंदेरी, मागे तूच दिसावा.
सांजवेळीच्या भूल-थापा, तुझी आणखी माया
कोण राहिले धापा टाकत? तिथे एकटी छाया.
काळोखाच्या खेळामध्ये, स्वप्ने उरली काही
हे असे वागणे तुझे मला पण, कधीच पटले नाही.

**-------संध्या रानडे**